लोकमत
www.lokmat.com
कोल्हापूर, शनिवार,
दि. १६ सप्टेंबर २०१७



कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात लहू मोरे यांना अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांच्या हस्ते वसुंधरा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी राहुल पवार, सुवर्णा भांबुलकर, विजय टिपुगडे उपस्थित होते. यावेळी डावीकडून अनिल बडदारे, एन्व्हायरो लीगल फोरमचे केदार मुनिश्वर, पत्रकार रणजित माजगांवकर, विश्वास बालिघाटे, बाळगोंडा पाटील यांनाही मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# वसुंधरा जपा नाही तर भविष्यकाळ घातक

## इंद्रजित देशमुख यांचे मत : वसुंधरा गौरव व वसुंधरा मित्र पुरस्काराचे वितरण; विविध कार्यक्रमांची रेलचेल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माणसाने आपल्या अस्तित्वाने पृथ्वीचा अंत पुढे ढकलायचा असतो; पण आज आपण पृथ्वीला अंताच्या अधिक जवळ नेत आहोत. आज पृथ्वी नाही सांभाळली तर भावी पिढी आपल्याला शाप देईल आणि भविष्यकाळ माणूस जातीसाठी घातक असेल, असे मत जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांनी व्यक्त केले.

कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी बाळगोंडा पाटील, विश्वास बालिघाटे, लहू मोरे यांना 'वसुंधरा गौरव' व अनिल बडदारे (राधानगरी), पत्रकार रणजित माजगांवकर, तसेच एन्व्हायरो लिगल फोरमला 'वसुंधरा मित्र पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. व्यासपीठावर भाऊसाहेब सूर्यवंशी, सचिन जिल्हेदार, प्रा. दीपक भोसले, कृष्णा गावडे, राहुल पवार, सुवर्णा भांबूलकर, विजय टिपुगडे उपस्थित होते.

यावेळी इंद्रजित देशमुख म्हणाले, माणसाला सर्वोत्तम जीवनशैलीऐवजी ब्रँडेड आयुष्य जगण्याचा हव्यास जडला आहे. निसर्गाकडून आपण फक्त घेत आहोत. दर पाच वर्षांनी पृथ्वीचे तापमान पाच डिग्री सेंटिग्रेडने वाढत आहे. आज माणसाकडून ज्या पद्धतीने पर्यावरणाचा विध्वंस केला जात आहे ते पाहता सन २०५० मध्ये पृथ्वीवर ना खाण्याच्या लायकीचे अन्न असेल, ना पाणी असेल ना श्वास घेण्यायोग्य हवा असेल आणि आपली भावी पिढी आपल्याला विचारेल की आमच्यासाठी तुम्ही काय ठेवलात. 'थिंक ग्लोबली अॅक्ट लोकली' हे वसुंधरेसाठीचे ब्रीदवाक्य अंमलात नाही आणले तर भावी पिढी आपल्याला शाप देईल आणि तो काळ माणूसजातीसाठी घातक असेल.

अनिल चौगुले यांनी स्वागत केले. राहुल पवार यांनी प्रास्ताविक केले. उदय गायकवाड यांनी मानपत्राचे वाचन केले. दुर्गा आजगांवकर व प्रतीक्षा व्हनबट्टे यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, गुरुवारी सकाळी कोगे येथील लहू मोरे यांच्या सेंद्रीय शेती प्रयोगास भेट देण्यात आली. त्यानंतर न्यू आर्किटेक्चर महाविद्यालयात 'रिव्हर अँड आर्किटेक्चर' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. दुपारी शाहू स्मारक भवनात लहान मुलांसाठी पर्यावरणविषयक चित्रपट दाखविण्यात आले.

### महोत्सवात आज

- सकाळी साडेआठ : रिव्हर फन (पंचगंगा घाट येथेलहान मुलांसाठी मनोरंजक खेळ)
- सकाळी नऊ : शोध नदीचा विषयावर युवा संवाद (छ. शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन अँड रिसर्च)
- दुपारी दोन : महिलांसाठी पर्यावरणविषयक चित्रपट (शाहू स्मारक)
- सायंकाळी साडेपाच : सूर सरिता (सांस्कृतिक कार्यक्रम)